# जालना जिल्हयातील वनक्षेत्र: एक अध्ययन

**डॉ. ताठे एस. व्ही.**
भूगोल विभाग प्रमुख
संत रामदास महाविद्यालय,
घनसांवगी.

**डॉ. सांगोळे एस. बी.**
सहायक प्राध्यापक

**प्रस्तावना :-**

वने ही पृथ्वी तलावरील एक महत्वाची साधनसंपदा आहे. वनस्पतीचे आच्छादन असलेल्या विशेषत वृक्षांचा समुह असलेल्या प्रदेशास वने म्हणतात. प्रामुख्याने प्राकृतिक रचना भुप्रदेशाचा विस्तार, समुद्र सपाटी पासुनची उंची, पर्जन्य, तापमान आणि मृदा याबाबतीत पृथ्वी तलावर फार मोठया प्रमाणात विभिन्नता आढळते. या घटकांचा परिणाम वनांच्या वाढीवर व विकासावर होत असल्यामुळे वनामध्ये मोठया प्रमाणात विभिन्नता आढळते. वन संपदेला मानवी जीवनात महत्त्वाचे स्थान आहे. मानवाच्या आर्थिक क्रियावर वनांचा प्रभाव पडतो. मानवांच्या मुलभूत गरजा वनामधुन भागविल्या जातात. वनामधुन मानवाला इंधन , लाकुड, डिंक, लाख, मध, साल, रबर, फळे, औषधी इत्यादी वस्तु वनांमधुन मिळतात. तसेच वनाधारित उदयोगांना लागणारा कच्चा माल वनांमधुन मिळतो.

पर्यावरण संतुलनासाठी वने असणे अत्यंत महत्वाचे असते. कोणत्याही प्रदेशात पर्यावरण संतुलन योग्य राहण्यासाठी एकुण जमिनी पैकी ३३% टक्के जमीन ही वनांच्या आच्छादनाखाली असणे आवश्यक असते. यापेक्षा कमी जमीन वनाच्छेदनाखाली असेल तर वेगवेगळया प्रकारच्या पर्यावरणीय समस्या निर्माण होतात. प्रामुख्याने विविध प्रकारचे प्रदुषण, पर्जन्यात घट, मृदाधुप, महापुर, वाळवंटीकरण, ओझन क्षय, कार्बन डायऑक्साईड मध्ये वाढ, वन्य प्राण्यांच्या संख्येत घट, आम्ल पर्जन्य यासारख्या समस्यामुळे जीवसृष्टीला धोका निर्माण झाला आहे.

आजच्या आधुनिक युगात वनस्पतींचा ऱ्हास मोठया प्रमाणात झाल्यामुळे पर्यावरणामध्ये मोठया प्रमाणात असमतोल निर्माण झालेला आहे. पर्यावरण संतुलित राहण्यासाठी वनांचे अनन्य साधारण महत्व आहे. वनांमुळे हवेत गारवा टिकुन राहतो. वनांमुळे मृदा सवंर्धन होते. नदी किनाऱ्यावर वृक्षांचे प्रमाण अधिक असल्यास जलप्रवाह परिणाम होऊ न पुर नियंत्रण होते. वनसंपदे पासुन पुढील फायदे मिळतात.

१. सम आणि थंड हवामान
२. पुर नियंत्रण
३. पर्जन्य वाढ
४. पाणी पातळीत वाढ
५. धुप नियंत्रण
६. मृदा संपन्नेत वाढ
७. वन्यप्राण्यांचे संरक्षण
८. वादळी वाऱ्यापासुन संरक्षण
९. प्रदुषण नियंत्रण
१०. पर्यावरण समतोल

मानवी जीवनात वनसंपदेला अनन्य साधारण महत्व आहे. जालना जिल्हयात फार कमी वनसंपदा आढळते. जिल्हयात एकुण भौगोलिक क्षेत्राच्या १.३३% वनक्षेत्र आहे. राज्यांच्या एकुण वनक्षेत्रांमध्ये जिल्हयाचा वाटा केवळ ०.१७% इतका अत्यल्प आहे. यावरु न जिल्हयातील वनक्षेत्र खुपच कमी असल्याचे दिसुन येते.

**अभ्यास क्षेत्र :-**

जालना जिल्हा दक्षिण पठाराच्या क्षेत्रात येतो. जालना जिल्हा मराठवाडयातील आठ जिल्हयातील एक असुन त्याचा विस्तार १९०१ ते२०.३ या उत्तर अक्षांश व ७५.४ रेखांश ते ७६.४० या पुर्व रेखावृत्तामध्ये येत असुन जिल्हयाच्या उत्तर सीमेवर जळगांव , पुर्वेस बुलढाणा, परभणी दक्षिणेस बीड व पश्चिमेस औरंगाबाद जिल्हे आहेत. जिल्हयाचे एकुण क्षेत्रफळ ७६८७.३९ चौ.कि.मी. असुन ते महाराष्ट्र राज्याच्या क्षेत्रफळाच्या तुलनेत २.५० % आहे. एकुण क्षेत्रफळाच्या १.३८% क्षेत्रफळ हे नागरी विभागाचे असुन ९८.६२ क्षेत्रफळ ग्रामीण विभागाचे आहे. प्रशासकीय सोयीसाठी आठ तलसिल कार्यालय हे भोकरदन, अंबड, जालना, बदनापुर, जाफ्राबाद, परतुर व मंठा याठिकाणी आहे.

**उद्दिष्टये :-**

१. जालना जिल्हयातील वनक्षेत्राचा अभ्यास करणे.

**माहिती संकलन व अभ्यास पध्दती :-**

सदरील शोध निबंधासाठी दुय्यम स्वरु पाची माहिती वापरण्यात आलेली आहे यासाठी जालना जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन २०१४-१५ ते २०२०-२१ तसेच जालना जिल्हा गॅझिटीअर, पुस्तके, मासिके व शोध निबंध यांचा वापर करण्यात आला आहे.

**जालना जिल्हयातील वनक्षेत्र :-**

जालना जिल्हयामध्ये वनांचे क्षेत्र फारच कमी प्रमाणात आढळते. जालना जिल्हयातील वनांमध्ये वड, पिंपळ, साग, जांभुळ, बोर, बांबु, बाभुळ, निवडुंग, करंज, आवळा, असे विविध प्रकारचे वृक्ष आढळतात. याशिवाय अनेक लहान वृक्ष व झुडपे आढतात.

**तक्ता क्र. १ - जालना जिल्हयातील वनक्षेत्र**

| वर्ष | वनक्षेत्र (हजार हेक्टर) | वनक्षेत्राचे भौगोलिक क्षेत्राशी असलेले प्रमाण |
|---|---|---|
| २०१४-१५ | ९.० | १.१७ |
| २०१५-१६ | ९.० | १.१७ |
| २०१६-१७ | ९.० | १.२ |
| २०१७-१८ | ९.० | १.२ |
| २०१८-१९ | १०.२४ | १.३३ |
| २०१९-२० | १०.२४ | १.३३ |
| २०२०-२१ | १०.२४ | १.३३ |

स्त्रोत :- सामाजिक व आर्थिक समालोचन जालना जिल्हा २०१४-१५ ते २०२०-२१

जालना जिल्हयातील वनक्षेत्रात वाढ होताना आढळुन येते परंतु ती अत्यंत कमी आहे. सन २०१४-१५ ते २०१७-१८ या काळात एकुण वनक्षेत्र हे ९ हजार हेक्टर होते. ते सन २०१८-१९ मध्ये वाढुन १०.२४ हजार हेक्टर झाले वनक्षेत्राचे भौगोलिक क्षेत्राशी त्याचे प्रमाण १.३३ % होते. यानंतर च्या काळात वनांमध्ये वाढ झालेली आढळत नाही. सन २०२०-२१ मध्ये ही १०.२४ हजार हेक्टर जमीन वनक्षेत्राखाली असुन त्याचे भौगोलिक क्षेत्राशी असलेले प्रमाण १.३३ % आहे. एकुण जालना जिल्हयामध्ये वनांचे प्रमाण कमी आढळते. वनक्षेत्र वाढवण्यासाठी विविध उपाययोजना शासनाने हाती घेतल्या आहे.

**निष्कर्ष :-**

जालना जिल्हयातील वनक्षेत्र कमी आहे. सन २०१४-१५ मध्ये ९.० हजार हेक्टर क्षेत्र वनांखाली होते ते २०२०-२१ या सात वर्षाच्या कालखंडामध्ये वाढ होवुन ते १०.२४ हजार हेक्टर झाले ही वाढ अत्यल्प आहे. एकुण क्षेत्रफळाच्या ३३ % क्षेत्र हे वनाखाली असणे आवश्यक आहे. पण ते तसे आढळत नाही. वाढते औद्योगिकीकरण, नागरीकरण, वाहतुक व दळणवळण यासाठी मोठया प्रमाणात वृक्ष तोड झाल्याने वनांचे प्रमाण कमी झाल्याचे आढळते. वनक्षेत्र वाढविण्यासाठी खालील उपाय योजना करता येतील.

**उपाय योजना :-**

१. वनसाक्षरता
२. सामाजिक वनीकरण
३. वृक्षारोपण
४. कायदे
५. वृक्षतोड पध्दतीत सुधारणा
६. आगीवर नियंत्रण
७. पर्यायी साधनांचा वापर

**ग्रंथसुची :-**

१. डॉ. वराट तु.म. - पर्यावरणशास्त्र एक अभ्यास
२. डॉ. जयकुमार मगर - आर्थिक भूगोल
३. डॉ. सवदी एस.बी. - महाराष्ट्राचा भूगोल
४. डॉ. ताठे एस.व्ही. - महाराष्ट्राचा भूगोल
५. सामाजिक व आर्थिक समालोचन जालना जिल्हा सन २०१४-१५ ते २०२०-२१
६. जालना जिल्हा गॅझिटीअर